लेख --} http://wp.me/pzBjo-pa

अमृतमंथन अनुदिनी --} http://amrutmanthan.wordpress.com/

# Hindi Will Destroy Marathi Language, Culture and Identity in Mumbai and Maharashtra (India)

(Note: The above article by Thiru. Thanjai Nalankilli was published in the May 2010 issue of the 'Tamil Tribune'. We have obtained their permission to publish translation of the article in Marathi on our 'Amrutmanthan' blog.)

# हिंदीमुळे मुंबईतील आणि महाराष्ट्रातील मराठी भाषा, संस्कृती व स्वत्व नष्ट होण्याचा धोका

लेखक: तंजाई नलनकिल्ली,

'तमिळ ट्रिब्यून', मे २०१० (दि० १ मे २०१०)

अनुवाद/रूपांतर: प्रा० मनोहर राईलकर, सलील कुळकर्णी

**अनुक्रमणिका**

१. मुंबईतील टॅक्सीचालक, हिंदी आणि मराठी.

२. हिंदी राजकारण्यांचं सामर्थ्य.

३. मुंबईतील हिंदीचा वाढता प्रसार आणि मराठीचा ऱ्हास.

४. मुंबई महापालिकेची अधिकृत भाषा.

५. महाराष्ट्र विधानसभेतील हिंदीची स्थिती.

६. मुंबई, एक महानगर.

७. भारत सरकाच्या भाषा-धोरणाचा परिणाम.

८. मराठी भाषा आणि मराठीचा वापर यांचा ऱ्हास.

९. मराठी वाङ्मयाचा ऱ्हास.

१०. मराठी संस्कृतीचा आणि अस्मितेचा ऱ्हास.

११. मराठी भाषा, संस्कृती आणि अस्मिता टिकवण्याकरता मराठी मनुष्य काय करू शकतो?

१२. अन्य अहिंदी प्रदेशांना सूचना.

## १. मुंबईतील टॅक्सी-चालक, हिंदी आणि मराठी.

मराठी भाषा महाराष्ट्रात हजाराहून अधिक वर्षं बोलली जाते. "ज्या व्यक्तीला मराठी भाषा लिहिता आणि वाचता येते, त्या व्यक्तीलाच टॅक्सी चालवण्याचे परवाने देण्यात येतील," असे, २० जानेवारी २०१० रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री० अशोक चव्हाण यांनी पत्रकारांना सांगितले. मुंबई शहरात २,००,००० हून अधिक टॅक्सीचालक आहेत. त्यांच्यापैकी बरेच हिंदीभाषक प्रदेशातून उपजीविकेसाठी म्हणून आले आहेत. त्यांतील बहुतेकांना मराठी लिहितावाचता येत नाही. टॅक्सी-चालक संघटनेच्या महासचिवांनी मराठी लिहिता-वाचता येण्याच्या ह्या अटीला तीव्र विरोध केला असून त्यांच्या मते टॅक्सी-चालक कामगार असल्यानं आता शाळेत जाऊन ते मराठी शिकू शकत नाहीत. ह्या विधानाबद्दल आम्हाला खरोखरच नवल वाटतं. खरं तर, टॅक्सी-चालकांना वाहनचालन परीक्षा द्यावी लागते. मग त्यांना वाहतुकीचे नियम जर शिकता येतात तर राज्याची मराठी भाषा शिकता येत नाही, हे म्हणणं आम्ही समजूच शकत नाही. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून आपल्या राज्याच्या प्रमुख शहरास भेट देण्यास आलेल्या आणि हिंदी येत नसलेल्या एखाद्या व्यक्तीनं रेलवेतून वा बसमधून मुंबईत उतरल्यावर हॉटेलपर्यंत कसं जावं अशी यांची अपेक्षा आहे? महाराष्ट्रातील आणि भारताच्या सर्व अहिंदी प्रदेशातील लोक इतरांनी आपली (हिंदी) भाषा शिकलीच पाहिजे अशी अपेक्षा एकीकडे करताना दुसरीकडे, आम्ही स्वतः मात्र स्थानिक मराठी भाषा शिकणार नाही, अशी भूमिका घेऊच कशी शकतात? ही मुजोरी आहे, ही एक प्रकारची दादागिरी आहे. ही वृत्ती फक्त मुंबईतील हिंदीवाल्यांचीच आहे असं नसून ज्या ज्या अहिंदी प्रदेशांत हे हिंदीभाषक लोक पोटापाण्याकरता जातात, त्या त्या सर्वच प्रदेशात त्यांचं वर्तन असंच असल्याचं आढळून येतं. [संदर्भ-१ पाहा.] हिंदी न शिकता एखादा मराठी माणूस हिंदी प्रदेशात जाऊन टॅक्सीचा व्यवसाय करू शकेल काय? शक्यच नाही. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) शिरीष पारकर सांगतात, "इतर प्रदेशातले जे लोक महाराष्ट्रात येतात ते स्वतःच्या पोटापाण्याकरता येतात. आमच्या भल्याकरता नव्हेत. तेव्हा त्यांना मराठी शिकायची सक्ती करायलाच हवी."

## २. हिंदी राजकारण्यांचं सामर्थ्य

मराठीच्या सक्तीला विरोध झाला तो फक्त मुंबईत पोटापाण्याकरता आलेल्या हिंदीवाल्यांकडूनच झाला असं नव्हे. तर हिंदी प्रदेशातल्या राजकारण्यांनीही तीव्र विरोध केला. हिंदीवाल्यांच्या ह्या हल्ल्यापुढं महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी कच खाल्ली आणि अगदी दुसऱ्याच दिवशी तो आदेश मागे घेतला. हिंदीभाषक राजकारण्यांचं सामर्थ्य फक्त त्यांच्या स्वतःच्याच प्रदेशापुरतं मर्यादित आहे असं नसून ते भारतात सर्वत्रच पसरलेलं आहे.

कोणताच मुख्यमंत्री हिंदी राजकारण्यांना अति दुखावून आपलं मुख्यमंत्रिपद फार काळ टिकवू शकत नाही. मार्च २०, २०१० रोजी पार पडलेल्या ८३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात बोलताना महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री० मनोहर जोशी म्हणाले, "कायदा (मराठी भाषा सक्तीची करणारा) करण्याची राज्य सरकारची इच्छा आहे. पण, त्याला केंद्राची (भारत सरकार) दहशत आहे." खरं तर, ज्या लोकनियुक्त सरकारजवळ बहुमत आहे, त्या सरकारच्या मुख्यमंत्र्याला अशी भीती का वाटावी? त्याचं कारण, भारत सरकार कोणत्याही राज्याचं सरकार (आणि मुख्यमंत्रीही) बरखास्त करू शकतं. भारतीय लोकसभेवर हिंदी राजकारण्यांचं प्रभुत्व आहे आणि त्याद्वारे ते भारत सरकारवर नियंत्रण ठेवतात. [संदर्भ-२ पाहा.] कुठल्याही राज्य सरकारने हिंदी लोकांच्या दृष्टीने अहितकारी निर्णय घेतला तर भारत सरकार ते राज्य सरकार बरखास्त करण्याची शक्यता असते. बरखास्तीची अशी तलवार प्रत्येक मुख्यमंत्र्याच्या डोक्यावर टांगती असते. त्यामुळं कोणताही निर्णय करण्यापूर्वी त्याला तिचा विचार करावा लागतो.

### ३. हिंदीचा प्रसार आणि मराठीची घसरण

जे कोणी मराठीच्या सक्तीला विरोध करीत आहेत त्यांच्या मते मुंबई हे महानगर आहे. त्यामुळं तो महाराष्ट्राचा भागच नव्हे तर मुंबईवर सर्व भारताचा अधिकार आहे. म्हणून मराठीची सक्ती करू नये. जे हिंदी राजकारणी मुंबईतल्या टॅक्सीचालकांना मराठीची सक्ती करण्यालाही विरोध करतात; तेच हिंदी राजकारणी भारत सरकारच्या आणि भारत सरकारनं नियंत्रित केलेल्या उद्योगांच्या, रेलवेच्या, हवाई वाहतुकीच्या, राष्ट्रीय बँकांच्या, आयुर्विमा महामंडळाच्या (LIC) तेल व नैसर्गिक वायु महामंडळाच्या (ONGC) वगैरे अन्य कित्येक उद्योगांच्या कर्मचाऱ्यांना हिंदीची परीक्षा देण्याची सक्ती करण्याच्या भारत सरकारच्या निर्णयाला मात्र पाठिंबा देतात. भारतभर असे लाखो कर्मचारी काम करीत आहेत.

हिंदी राजकारण्यांच्या असल्या दुटप्पी धोरणाचा अधिक खोलवर विचार करू या. एकीकडे मुंबईसारख्या मराठी शहराच्या टॅक्सीचालकांना मराठी शिकण्याची सक्ती करायची नाही. पण दुसरीकडे, त्याच मुंबईतल्या स्टेट बँकेच्या कर्मचाऱ्यांना, हिंदीची परीक्षा द्यायला लावायची. आणि जरी तिथं येणारे खातेदार मराठीभाषक असले तरी त्यांना (कर्मचाऱ्यांना) मराठी आलं नाही तरी चालेल, असं म्हणायचं. आयुर्विमा महामंडळाच्या (LIC) मुंबई शाखांतल्या कर्मचाऱ्यांना हिंदी आलं पाहिजे. पण बहुतेक ग्राहक मराठीभाषक असूनही मराठीचं ज्ञान नसलं तरी चालेल.

आता रेलवे स्थानकावर चला. तिथंही सर्व कर्मचाऱ्यांना हिंदी यायला हवं. पण, स्टेशनमास्तरांना, तिकीट-कारकूनांना किंवा इतर कर्मचाऱ्यांना मराठी आलं नाही तरी चालेल. छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे (CSIA) जाऊ. तिथल्याही सर्व अधिकाऱ्यांना हिंदी यायला हवंच. पण, मराठी नाही आलं तरी चालेल. भारत सरकारच्या मालकीच्या एअर इंडिया कंपनीच्या कोणत्याही विमानाने प्रवास करा. विमानामधील

सर्व कर्मचाऱ्यांना हिंदी यायलाच हवं; पण, मराठी नाही आलं तरी चालेल. असे आहे भारताचे अन्यायकारक भाषिक धोरण. आणि त्यानुसार कुठल्याही राज्याने स्वतःची भाषिक अस्मिता राखण्याच्या प्रयत्नाला हिंदी भाषक आणि हिंदी राजकारणी विरोध करतात. ह्या धोरणाप्रमाणे स्थानिक भूमिपुत्रांची भाषा – मराठी – ही मुंबईमध्ये अनावश्यक व कुचकामी ठरवली जाते आणि शेकडो मैलांवरील दूरची हिंदी भाषा येणं आवश्यक आणि अनिवार्य ठरते. सरळसोप्या भाषेत सांगायचं तर महाराष्ट्राचं भूषण असलेल्या मुंबईचे निर्मराठीकरण करून तिचं हिंदीकरण केले आहे.

## ४. मुंबई महानगरपालिकेची अधिकृत भाषा

टॅक्सीचालकांना मराठी अनिवार्य करण्याच्या धोरणाला विरोध करणाऱ्या हिंदीवाल्यांना मुंबई महानगर पालिकेचीसुद्धा अधिकृत भाषा हिंदी करायची आहे. वास्तविक, हे सर्व लोक मुंबईत कामधंदा मिळवून पोट भरण्याकरता येतात. पण स्वतः स्थानिक भाषा शिकण्याऐवजी, मुंबई महानगरपालिकेने त्यांच्याशी संपर्काकरता आपलीच मातृभाषा वापरावी असा हे आग्रह धरतात. पहा तरी ह्या हिंदीवाल्यांचा उर्मटपणा आणि माजोरीपणा! मुंबईत तमिळी, बंगाली, पंजाबी, तेलुगु... असेही लोक राहतात. पण त्यातल्या कुणीही आपलीच भाषा मुंबईची अधिकृत भाषा असावी असा आग्रह कधी धरला नाही. हिंदी प्रदेशातील दिल्लीत आज कितीतरी मराठी आणि अन्यभाषक लोक राहतात. मग आपल्या शहराची अधिकृत भाषा मराठी, किंवा इतर कुठली भारतीय भाषा असावी असं म्हणायला दिल्ली तयार होईल का? शक्यच नाही. मग, मुंबईची अधिकृत भाषा हिंदी असावी असं म्हणायचा कोणता अधिकार हिंदीवाल्यांना पोचतो? भारतात अशा प्रकारची मागणी करणारा केवळ हिंदी समाजच आहे. व्यवसायानिमित्त, पोटापाण्याकरता अन्य प्रांतात जाणाऱ्या लोकांनी स्थानिक भाषा शिकायला हवी. आपली भाषा स्थानिकांनी शिकावी असा आग्रह ते धरूच शकत नाहीत. मनसेच्या शिरीष पारकरांचं म्हणणं रास्तच आहे की, "अन्य प्रांतातले लोक स्वतःची गरज म्हणून महाराष्ट्रात येतात, आमच्या गरजेकरता नाही येत. त्यांना मराठी येणे अनिवार्य करायलाच पाहिजे."

## ५. महाराष्ट्र विधानसभेत हिंदी

आपल्याला सफाईदार मराठी येत नसल्यानं कामकाजाच्या कागदपत्रांची हिंदी भाषेतली प्रत मिळावी अशी मागणी २००९च्या ऑक्टोबरात समाजवादीपक्षाचे आमदार श्री० अबू आझमींनी केली. वास्तविक, त्यांनी स्वतःच मान्य केलं की महाराष्ट्रात आपण ४० वर्षं वास्तव्याला असूनही आपल्याला मराठी येत नाही. प्रत्येक राज्याला विविध व्यवहार आपापल्या प्रादेशिक भाषेत करणं शक्य व्हावं तसेच भारतातील सर्व प्रमुख भाषांना देशात महत्त्वाचं स्थान मिळावं आणि त्यांचा आधुनिक युगातील भाषा म्हणून विकास व्हावा ह्याचकरता पन्नाशीच्या दशकामध्ये भाषावार राज्यरचना अस्तित्वात आली. तेव्हा महाराष्ट्रातील सर्व राजकारण्यांनी

स्थानिक भाषा शिकायलाच पाहिजे. आपण ज्या प्रांतात जन्मलो त्या प्रांताची भाषा अधिकृत करण्याची मागणं रेटणं म्हणजे भाषावार प्रांतरचनेमागील मूलतत्त्वालाच सुरुंग लावण्यासारखं होईल.

## ६. मुंबई हे महानगर आहे

टॅक्सीचालकांना मराठी अनिवार्य करण्याच्या हेतूला विरोध करणाऱ्यांचं म्हणणं "मुंबई हे महानगर (विशाल उद्योगनगरी) असल्यानं मराठीचं ज्ञान अनिवार्य करणं उचित नाही", असं आहे. महानगर असो वा नसो, पण मुंबई महाराष्ट्रातील शहर नक्कीच आहे. केवळ आता ती एक उद्योग आणि संस्कृतीचे एक प्रमुख शहर बनली आहे हे कारण पुढे करून तिचं निर्मराठीकरण करून हिंदीकरण करणं हे खपवून घेतले जाता कामा नये. पॅरिसही महानगरच आहे. पण तिथल्या प्रत्येक टॅक्सीचालकाला फ्रेंच येतं. आणि तोक्योही महानगर असून तिथल्या प्रत्येक टॅक्सीचालकाला जपानी येतं.

जर मुंबई (बहुभाषिक) महानगर असेल आणि म्हणून टॅक्सीचालकाला मराठी येणं आवश्यक नसेल तर मुंबईतल्या रेलवे स्थानकावर काम करण्याकरता हिंदीच कशाला यायला हवं? छत्रपती आंतरराष्ट्रीय विमानतळावर (CSIA) हिंदी कशाला यायला हवं? मुंबईहून किंवा मुंबईकडे जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानांच्या प्रवासामध्ये हिंदीत घोषणा कशाकरता करायला हव्यात? (आपल्या माहितीसाठी सांगतो, एअर इंडियाने आपल्या विमानांच्या उड्डाणांची घोषणा मराठीत करायला नकार दिला आहे.)

## ७. भारत सरकारच्या भाषिक धोरणाचे परिणाम

मुंबईतल्या चालू भाषिक परिस्थितीचा आणि तेथील हिंदी-मराठी झगड्याचा आढावा आतापर्यंत आपण घेतला. निदान काही विशिष्ट प्रकारच्या कामाकरता तरी स्थानिक भाषा म्हणून मराठी आवश्यक असावी असं मराठीवाल्यांना वाटतं. तर, हिंदीवाल्यांचं असं म्हणणं आहे की मुंबईतील नोकऱ्यांकरता आणि उद्योगांकरता मराठी आवश्यक असता कामा नये; मात्र मुंबईतील निदान रेलवे, विमानतळ, बँका ह्यांसारख्या केंद्रीय कार्यालयांकरता तरी हिंदीचं ज्ञान अत्यावश्यक असावं असाही त्यांचा आग्रह आहे. मग अशा परिस्थितीत मुंबईत मराठीला बाजूला सारण्यात हिंदीगट यशस्वी झाला तर त्याचे परिणाम काय असतील?

## ८. मराठी भाषेचा अभ्यास आणि वापर ह्यांचा ऱ्हास

मुंबईतल्या बहुतेक नोकऱ्यांकरता मराठीचा वापर अनावश्यक ठरत असेल आणि त्याच बरोबर भारत सरकारच्या विविध कार्यालयांतल्या हजारो नोकऱ्यांकरता हिंदी अत्यावश्यक ठरत असेल तर, पालकांचा भर स्वाभाविकपणं, आपल्या पाल्यानं हिंदी आणि इंग्रजीवर प्रभुत्व मिळवावं, ह्यावरच राहील आणि मग त्याच वेळी मराठीकडे दुर्लक्ष होणं स्वाभाविक ठरेल. मराठी पालकांना आपल्या मातृभाषेपेक्षा इंग्रजी-हिंदीचं प्रेम अधिक आहे, असा याचा अर्थ नाही. पण, नोकऱ्या मिळवण्याकरता मराठी अनावश्यकच आहे, ही भावना

प्रबळ होऊन बसेल. महाराष्ट्रात केंद्र, राज्य सरकारी किंवा खाजगी नोकऱ्या मिळण्याकरता मराठी अत्यावश्यक करा आणि मग आपल्या पाल्याला मराठीवर प्रभुत्व मिळावं यासाठी पालक कसे धडपडतात ते पाहा.

मराठीकडे दुर्लक्ष होण्याची साथ मोठ्या शहरांत उगम पावली असून ती लवकरच सबंध महाराष्ट्रात पसरत जाते की नाही ते पाहाच. खरं तर मोजक्याच पिढयांत, मराठी केवळ घरात बोलण्याची भाषा होऊन राहील आणि इंग्रजी व हिंदी ह्या शिक्षण आणि उद्योगांच्या क्षेत्रांत अनिर्बंध राज्य करू लागतील. भारत सरकारच्या देशभारातील कार्यालयांमधील लाखो नोकऱ्यांसाठी हिंदी आवश्यक असल्यामुळे मराठीप्रमाणे हिंदीची गत कधीच होणार नाही. मराठी अशी बाजूला पडून उपेक्षित राहू नये असं वाटत असेल तर खाजगी किंवा राज्य शासनाच्या आणि केंद्र सरकारच्या खात्यांतील नोकऱ्यांसाठी मराठी भाषा अत्यावश्यक करणे हा एकमेव उपाय आहे.

## ९. मराठी वाङ्मयाचा ऱ्हास

एकदा का शाळांत मराठीकडे दुर्लक्ष होऊ लागलं की मराठी वाचनसंस्कृतीचा ऱ्हास सुरू झालाच म्हणून समजा. आणि  वाचकवर्ग कमी होऊ लागला की मराठीत लिहिणाऱ्यांची संख्याही आटत जाईल. मराठी लेखकही मग हिंदी किंवा इंग्रजीमध्ये लिहू लागतील. मराठीत असलेल्या संपन्न वाङ्मयाचीही तीच अवस्था होऊ लागेल. यापुढच्या किंवा त्यानंतरच्या पिढ्यांना अभिजात मराठी वाङ्मयाचा आस्वाद घेणे तर सोडाच पण समजणंसुद्धा अशक्य होऊ लागेल. ग्रंथालयांतल्या अभिजात मराठी ग्रंथांवर धुळीची पुटंच्या पुटं चढू लागतील. मराठी वाङ्मय संपन्न करण्याचा एकच मार्ग आहे. नवीन वाङ्मयाची निर्मिती आणि अभिजात मराठी वाङ्मयाचा अभ्यास. मराठी वाङ्मयाच्या निर्मिती व अभ्यासाकरता सरकारी साह्य ही वरवरची मलमपट्टी ठरेल. महाराष्ट्रातील उद्योगांत, नोकऱ्यांत मराठी अत्यावश्यक करणे हेच खरं उत्तर आहे.

## १०. मराठी संस्कृतीचा आणि स्वत्वाचा ऱ्हास

वाङ्मय म्हणजे केवळ मनोरंजन नव्हे. विशेषतः अभिजात वाङ्मयाला तर हे प्रकर्षानं लागू आहे. अभिजात वाङ्मयामध्ये इतिहास असतो, संपन्न परंपरा असतात आणि आपल्या संस्कृतीची पाळेमुळेही असतात. पण, येत्या दोन किंवा तीन पिढयांतच महाराष्ट्रातली बहुसंख्य जनता ते वाचणार नाही किंवा वाचू शकणारच नाही, आणि मग आपल्या संपन्न परंपरा व वाङ्मयाबद्दल प्रेम आणि अभिमान बाळगणार नाहीत, अशी परिस्थिती उद्भवेल. ज्या समाजाला आपला इतिहास माहीत नाही, आपलं वाङ्मय, आपल्या परंपरा यांच्या बद्दल अभिमान नाही, तो समाज आपलं स्वत्व, आपली अस्मिताच हरवून बसतो. मराठीच्या रक्षणाच्या बाबतीत महाराष्ट्र सरकारनं आणि महाराष्ट्रातील जनतेनं काही प्रभावी कृती केली नाही तर मराठीला अशी भीषण अवस्था लवकरच येईल, अशी स्पष्ट चिन्हं दिसत आहेत. टॅक्सी चालकांना मराठी अनिवार्य करण्याच्या विषयात झालेला तंटा हा मुंबई आणि महाराष्ट्र राज्यात मराठीच्या अस्तित्वाच्या रक्षणासाठी चाललेल्या रस्सीखेचीच्या

मोठ्या झगड्याचा केवळ आरंभ आहे. आज जर मुंबईचे निर्मराठीकरण केले गेले तर उर्वरित महाराष्ट्रात त्याचे अनुसरण होण्यास काही दशकांहून फार अधिक वेळ लागणार नाही.

### ११. आपली भाषा, संस्कृती आणि स्वत्व ह्यांच्या रक्षणाकरता मराठी जनता काय करू शकते?

मुंबईत आणि संपूर्ण महाराष्ट्रात मराठी भाषा, संस्कृती आणि स्वत्व राखण्यासाठी पद्धतशीरपणे आणि विचारपूर्वक नियोजन करून एक मोहीम आखायला हवी. मराठीच्या बाबतीत टॅक्सी चालकांना मराठी सक्तीचं करणं, शाळा-महाविद्यालयांतील अभ्यासक्रमांत मराठी अनिवार्य करणं, किंवा दुकानांवर मराठी नामफलक लागणं, अशा फुटकळ मुद्द्यांवर मधून मधून नेहमी किंवा अचानक होणाऱ्या उद्रेकामुळे चळवळी किंवा निषेध मोर्चे काढण्यानं मूळ प्रश्न सुटणार नाही. त्या प्रश्नाच्या मूलभूत कारणांसाठी योग्य उपाययोजना करायला पाहिजे.

१) पूर्वी शिक्षण हा पूर्णपणं राज्य सरकारच्या अखत्यारीतला विषय होता. नंतर तो राज्य आणि केंद्र ह्यांच्या संयुक्त अखत्यारीतला विषय बनला. तो पुन्हा राज्याच्या अंतर्गत आणायला पाहिजे. सर्व शाळा, महाविद्यालयं आणि उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था राज्य सरकारच्या अमलाखाली आणायला हव्यात. तसे झाले तरच शिक्षणक्षेत्रात मराठीला स्वतःचं रास्त स्थान प्राप्त होईल. भारत सरकारनं करसंपत्तीचा अधिकाधिक भाग राज्यांकडे सोपवायला पाहिजे. म्हणजे आपापल्या राज्यातील प्राथमिक शाळांपासून ते उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांपर्यंत विविध शैक्षणिक संस्थांना यथायोग्य साहाय्य करणे राज्यांना शक्य होईल. त्यासाठी लागणाऱ्या निधीकरता दर वेळी केंद्राकडे हात पसरण्याची पाळी राज्यावर येणार नाही.

२) महाराष्ट्रात नोकरीधंदा करणाऱ्या प्रत्येकाला, मग तो खासगी उद्योगधंद्यात असो, नगरपालिकेत असो, राज्य सरकारच्या कार्यालयात असो किंवा केंद्रीय कार्यालयात असो, उत्तम प्रकारे मराठी लिहिता आणि वाचता यायलाच पाहिजे.

३) केंद्र सरकारची महाराष्ट्रातील कार्यालयं आणि महाराष्ट्रातील जनता ह्यांच्यांतला सर्व संवाद व संज्ञापन मराठीतच झालं पाहिजे.

राज्य शासनाला अशा उपाययोजनेची अंमलबजावणी करण्याचे अधिकार नाहीत. तसं होण्याकरता संसदेनं कायदा करावा लागेल आणि घटना दुरुस्तीही करावी लागेल. प्रस्तुत लेखकानं भारत सरकारच्या भाषाधोरणाचा आणि आजवरच्या कार्यवाहीचा कैक वर्षं अभ्यास केला आहे. त्यामुळं, बहुमत नसलं तरी हिंदीवाल्यांचा मोठा प्रभाव असल्यामुळं आजच्या संसदेकडून हे मुळीच घडणं शक्य नाही, असं प्रस्तुत लेखकाचं मत बनलं आहे. तेव्हा आज मराठी जनतेपुढं दोनच पर्याय आहेत. मराठी टिकवून धरण्यासाठी काही निश्चित कृतियोजना आखायची अन्यथा महाराष्ट्रात मराठीचा ऱ्हास आणि नाश पत्करायचा!

## १२) इतर अहिंदी राज्यांना संदेश

आज जात्यात मुंबई आहे. उद्या सुपातले कोलकाता असेल, बेंगळुरू असेल, मग हैदराबाद आणि चेन्नै यांची पाळी येईल. बघता बघता सर्व मोठ्या शहरांचं हिंदीकरण होऊन जाईल आणि प्रादेशिक भाषा एकेक करून बाजूला फेकल्या जातील. विनाशाची ही प्रक्रिया मोठया शहरांकडून राज्याच्या इतर भागांमध्ये पसरत जाईल. खरं तर, बेंगळुरू आणि चेन्नैमध्ये अशी स्थिती अजुन यायची राहिलेली नसून आलेलीच आहे. (मला कोलकाता आणि हैदराबाद यांची अवस्था काय आहे, ते माहीत नाही.) एकीकडे उभं राहून नुसती बघ्याच्या भूमिका घेण्यापेक्षा महाराष्ट्रातील जनतेच्या मराठीची अस्मिता टिकवण्याच्या लढयाला सर्व अहिंदी प्रदेशांनी पाठिंबा दिला पाहिजे.

(लेखक, श्री० तंजाई नलनकिल्ली तमिळनाडूत राहतात. केंद्र सरकारच्या भाषिक धोरणावर आणि तमिळनाडूचं, तसंच तमिळ भाषेचं भवितव्य ह्यावर त्यांनी डझनाहून अधिक लेख लिहिले आहेत. नलनकिल्लींच्या हिंदी-विरोधामागील भूमिका जाणून घेण्यासाठी आंतरजाल आणि आंतरजालावरील अभिलेखसंग्रहांचं परिशीलन करावं.)

### टीप:

वरील लेखात मांडलेल्या विचारांमागील कायदेशीर पार्श्वभूमी व तर्कशुद्ध विश्लेषण अमृतमंथन अनुदिनीवरील खालील लेखातही चर्चिले आहेत.

http://amrutmanthan.wordpress.com/2009/11/15/हिंदी-ही-राष्ट्रभाषा-एक-च/

http://amrutmanthan.wordpress.com/2009/12/21/एकच-अमोघ-उपाय-मराठी-एकजूट/

### संदर्भ:

१. Hindi and Hindian Arrogance Test our Patience (by Thanjai Nalankilli), TAMIL TRIBUNE, April 2010 (15 KB)

२. Who Rules India? (Part I) (by Thanjai Nalankilli), TAMIL TRIBUNE, November 2000 (44 KB)

❑ ❑ ❑